पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्‍यालय, फुलंब्री

# परीक्षा विभाग

# वार्षिक अहवाल 2020-21

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## परीक्षा विभाग अहवाल-2020-21

कोविड 19 च्या संसर्गामुळे व शासनाने टाळेबंदी लागू केल्यामुळे मागील शैक्षणिक वर्षात मार्च/एप्रिल 2020 मध्ये होणाऱ्या नियोजित परीक्षा ऐनवेळी पुढे ढकलण्यात आल्या होत्या. विद्यापीठ परीक्षेसंबंधी दाखल झालेल्या न्यायालयीन याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार पदवी वर्गाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेणे अनिवार्य केले.

### मार्च/एप्रिल 2020 या परीक्षा ऑक्टोबर 2020 मध्ये संपन्न:-

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पदवी वर्गाच्या प्रथम, तृतीय, पाचव्या व सहाव्या सत्राच्या परीक्षा दिनांक 09 ऑक्टोबर 2020 पासून घेण्याचा निर्णय घेतला. परीक्षेत कोविड 19 चा संसर्ग रोकण्यासाठी शासनाने घालून दिलेल्या सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक असल्यामुळे महाविद्यालयात त्यासंबंधी नियोजन करण्यात आले. परीक्षेदरम्यान परीक्षा विभागातील कर्मचारी,प्राध्यापक व परीक्षार्थी यांनी तोंडाला व नाकाला मास्क बांधने, सामाजिक आंतर पाळणे व सैनिटायझर वापरणे बंधनकारक करण्यात आले. याचे तंतोतत पालन करून घेण्यासाठी दोन प्राध्यापकांची एक समन्वय समिती स्थापन केली. परीक्षेच्या दोन दिवस अगोदर परीक्षा विभागातील कामाचे वाटप करण्यात आले. परीक्षा केंद्रप्रमुख प्राचार्य डॉ. सुभाष टकले, अंडरस्टडी डॉ.रामकिशन लोमटे, तंत्र सहायक श्री प्रेम चव्हाण तसेच कर्मचारी श्री बाबासाहेब दाभाडे, श्री विनोद तुपे, श्री रत्नाकर जाधव व श्री जयराम जाधव या सर्वांना त्यांची कामे व जबाबदारी निश्चित करण्यात आली.



## OMR उत्तरपत्रिका मुल्यांकनातील त्रुटी दूर केल्या:-

सदर परीक्षेत OMR उत्तरपत्रिका वापरण्यात आलेल्या होत्या. निकाल जाहीर होताच असे लक्षात आले की, OMR उत्तरपत्रिका मुल्यांकनातील त्रुटीमुळे काही विषयात सर्व विद्यार्थी अनुतीर्ण झाले होते तसेच काही विद्यार्थ्यांचे निकाल राखीव होते. त्यासंबंधी विद्यापीठाने दिलेल्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांचे तक्रार अर्ज जमा करून विध्यापीठाला सादर केले. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांच्या निकालातील त्रुटी दुरुस्त करून आणल्या.

## शैक्षणिक वर्ष 2020-21 मधील पहिल्या सत्रातील परीक्षा:-

कोविड 19 च्या संसर्गामुळे व शासनाने टाळेबंदी लागू केल्यामुळे शैक्षणिक वर्ष 2020-21 हे उशिरा म्हणजेच 01 नोव्हेंबर 2020 पासून सुरु झाले. दरवर्षी ऑक्टोबर/नोव्हेंबर 2020 मध्ये होणाऱ्या परीक्षा मार्च/एप्रिल 2021 मध्ये संपन्न झाल्या. दि.16 मार्च 2021 पासून पदवीच्या द्वितीय व तृतीय वर्षाच्या परीक्षेचे नियोजित वेळापत्रक प्राप्त झाले. ऑनलाईन व ऑफलाईन यापैकी एक पर्याय निवडण्याची विद्यार्थ्यांना संधी दिली. सदर परीक्षा संबंधी नियोजन करण्यासाठी बैठक दि.13 मार्च 2021 रोजी घेतली. खालील प्रमाणे कामाची जबाबदारी सोपविण्यात आली. परीक्षा विभागातील तांत्रिक काम श्री प्रेम चव्हाण, ऑनलाईन

परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना तांत्रिक सहकार्य करण्याचे काम श्री साईनाथ भालेराव, परीक्षा विभागातील कामे श्री रत्नाकर जाधव, विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था श्री जयराम जाधव, गेट जवळ परीक्षार्थींचे तापमान तपासणे श्री विनोद तुपे, कोविड 19 चा संसर्ग रोकण्यासाठी शासनाने घालून दिलेल्या सर्व नियमांचे पालन करण्यासंबधी विद्यार्थ्यांना सूचना देण्यासाठी समन्वय समितीत दोन प्राध्यापक नियुक्त केले. यावेळी विद्यापीठाने उत्तरपत्रिका मूल्यांकनाचे काम महाविद्यालयाकडे दिलेले असल्यामुळे त्याचेही नियोजन करण्यात आले. त्यासाठी कस्टोडीएन म्हणून डॉ. संजय पांचाळ यांची नेमणूक केली.

दि.16 मार्च 2021 ते 12 एप्रिल 2021 या कालावधीत बी.ए., बी.कॉम. बी.एस्सी. च्या द्वितीय व तृतीय वर्गाच्या परीक्षा संपन्न झाल्या. दि.09 एप्रिल 2020 पासून प्रथम वर्षाच्या परीक्षा सुरु झाल्या असताना कोविड 19 चा संसर्ग पुन्हा वाढल्यामुळे महाराष्ट्रात शासनाने टाळेबंदी लागू केली. विद्यापीठाने दि.२ मे 2021 पर्यंत परीक्षा स्थगित केल्या. त्यानंतर दि.3 मे 2021 पासून उर्वरित परीक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने ऑनलाईन पद्धतीने घेतल्या. ऑनलाईन परीक्षा देताना विद्यार्थ्यांना तांत्रिक सहाय्य करण्याचे काम श्री प्रेम चव्हाण व श्री साईनाथ भालेराव यांनी केले.

## दुसऱ्या सत्रातील परीक्षा:-

शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये मार्च/एप्रिल 2021 मध्ये होणाऱ्या दुसऱ्या सत्राच्या परीक्षा जुलै/ऑगस्ट 2021 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने. बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. द्वितीय व तृतीय वर्षाच्या परीक्षा दिनांक 29/07/2021 पासून ऑनलाईन पद्धतीने झाल्या तसेच बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. प्रथम वर्षाच्या परीक्षा दिनांक:10/08/2021 पासून ऑनलाईन पद्धतीने झाल्या. ऑनलाईन परीक्षा देताना विद्यार्थ्यांना तांत्रिक सहाय्य करण्याचे काम श्री प्रेम चव्हाण व श्री साईनाथ भालेराव यांनी केले.

डॉ. रामकिशन लोमटे
परीक्षा विभागप्रमुख